# हिंजवडी पोलीस ठाणे,पिंपरी चिंचवड

## प्रेसनोट ता. १८/०९/२०२४

## पत्नीसोबत अनैतिक संबंधाच्या संशयावरुन तरुणाचा गळा चिरुन खुन करुन बिहार राज्यात पळून जाणाऱ्या आरोपीस हिंजवडी पोलीस ठाणे तपास पथकाकडुन ३ तासात शिताफीने अटक

---

दि. १८/०९/२०२४ रोजी ०२:०० वा. चे सुमाराम पोलीस ठाणे येथे खबर प्राप्त झाली की, पाषाण एनडीए रोड, तुषार बालवडकर यांची जागा, आयपीएस कॉलनी समोर बावधन या ठिकाणी असलेल्या ग्रीनड्रिम नर्सरीचे ताडत्रीचे शेडमध्ये एका इसमाचा गळा चिरुन रक्ताच्या थारोळ्यात पडला आहे. अशी माहिती हिंजवडी पोलीस स्टेशन येथे प्राप्त झाली. प्राप्त माहितीच्या अनुषंगाने हिंजवडी पोलीस ठाणेकडील वरिष्ठ अधिकारी व तपास पथक यांनी तात्काळ घटनास्थळाला भेट दिली. सदर ठिकाणी अंदाजे २५ ते २६ वर्षे वयाचे इसमाचे गळ्यावर कोणीतरी अज्ञाताने धारदार शस्त्राने वार करुन त्याचा खुन केला आहे. मयत इसमाबाबत आजुबाजूला चौकशी करता त्याचे नाव **प्रविणकुमार भोला महतो, वय-२६ वर्षे रा. मच्छाही, जि.मुझ्झपरनगर, बिहार** राज्य असे असल्याचे समजले.

सदर घटनेची माहिती वरिष्ठांना कळविलेनंतर वरीष्ठांनी तात्काळ भेट दिली व तेथे उपस्थित असलेले हिंजवडी पोलीस ठाण्याचे वपोनि., पोनि. गुन्हे तसेच तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना अज्ञात आरोपीचा शोध घेऊन अटक करणे व गुन्ह्याचे तपासाचे अनुषंगाने मार्गदर्शन करुन सुचना दिल्या. त्याप्रमाणे वपोनि. हिंजवडी यांनी तपास पथकाच्या सपोनि. महाले यांच्यासह घटनास्थळाचे आजुबाजूचे सीसीटीव्ही बघने, रेल्वे स्टेशन येथे आरोपीचा शोध घेणे, टोल नाका हायवे व तांत्रिक विश्लेषण करणे अशा ४ टिम तपासकामी रवाना केल्या. घटनास्थळावर वरील प्रमाणे तपास करीत असताना मयत इसम व राजीवकुमार नथुनीप्रसाद सिंह, वय-३३ वर्षे, रा. मच्छाही, जि.मुझ्झपरनगर, बिहार राज्य याची पत्नी यांचे अनैतिक संबध असलेबाबत माहिती समोर आल्याने तात्काळ तांत्रिक विश्लेषणात राजीव कुमार हा पुणे बावधान येथे येऊन गेलेबाबत व तांत्रिक विश्लेषणाअंती मानपाडा येथे ट्रेस करुन तात्काळ वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली मानपाडा, ठाणे येथे पाठवून आरोपी नामे **१) राजीवकुमार नथुनीप्रसाद सिंह, वय-३३ वर्षे, रा. मच्छाही, जि.मुझ्झपरनगर, बिहार व २) धीरजकुमार रमोदसिंग, वय २० वर्षे, रा. सदर** यांना ताब्यात घेतले. त्यावेळी त्यांनी त्याच्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन प्रविणकुमार याचा धारदार चाकुने गळा चिरुन खुन केल्याचे कबुली दिली व बिहार येथे जाऊन त्याचे पत्नीचा देखील खुन करणार असल्याचे सांगितले.

सदर बाबत **हिंजवडी पोलीस ठाणे, पिं.चिं. येथे गु.र.नं. १०७३/२०२४ भा.न्या.संहिता २०२३ चे कलम १०३(१)** ( भा.दं.वि. कलम ३०२,३४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री.विनयकुमार चौबे साो, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. श्री.डॉ.शशीकांत महावरकर सो. सह पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. श्री.वसंत परदेशी सो.अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. विशाल गायकवाड, पोलीस उप आयुक्त परि. २, पिंपरी चिंचवड, मा. श्री. सुनिल कुहाडे सहा. पोलीस आयुक्त, वाकड विभाग, पिं.चिं. यांचे मार्गदर्शनाखाली हिंजवडी पोलीस ठाणेचे श्री.कन्हैया थोरात, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. ऋषीकेश घाडगे, पोलीस निरीक्षक गुन्हे तपास पथकाचे प्रमुख प्रशांत महाले,सहायक पोलीस निरीक्षक, बंडू मारणे, श्रेणी पोलीस उप निरीक्षक, पोलीस अंमलदार बाळकृष्ण शिंदे, नरेश बलसाने, बापुसाहेब धुमाळ, योगेश शिंदे, कुणाल शिंदे, कैलास केंगले, विक्रम कुदळ, संजीव सावंत, संतोष डामसे, अरूण नरळे, कारभारी पालवे, दत्ता शिंदे, ओमप्रकाश कांबळे, स्वप्नील साबळे, मंगेश लोखंडे (परि-२) यांनी केली आहे.

(विशाल गायकवाड)
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ-२,
पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड,